IIP: WJHSS | IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# निवडणूक आयोगाचे राजकीयकरण

**प्रा.डॉ. हनुमंत कुरकुटे**

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

संगमनेर नगरपालिका कला,दा.ज.मालपाणी वाणिज्य & ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर.

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*स्वायत्तता, लोकशाही, राजकीयकरण, निवडणूक आयुक्त, निवडणूक, सत्ताधारी, विरोधी, पक्षपात.*

**ABSTRACT**

लोकशाही व्यवस्थेचा खरा पाया स्वच्छ, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांवर उभा असतो. या निवडणुकांची विश्वासार्हता जपण्याची जबाबदारी भारतीय संविधानाने थेट निवडणूक आयोगावर सोपवली आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत स्थापन झालेला निवडणूक आयोग हा केवळ प्रशासकीय संस्था नसून, तो लोकशाहीचा रक्षक आणि संविधानाचा प्रहरी मानला जातो. त्यामुळे आयोगाची भूमिका राजकीय सत्तेच्या अनुकूल किंवा प्रतिकूल न राहता पूर्णतः संवैधानिक, तटस्थ आणि स्वायत्त असणे अपरिहार्य आहे. मात्र अलीकडच्या काळात निवडणूक प्रक्रियेतील काही निर्णय, कारवाया आणि त्यावरील सार्वजनिक प्रतिक्रिया पाहता, निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. आयोगाच्या काही निर्णयांकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात असल्याची भावना नागरिक, विरोधी पक्ष आणि नागरी समाजात बळावत आहे. ही परिस्थिती लोकशाहीसाठी चिंताजनक असून, निवडणूक आयोगाच्या मूळ संवैधानिक भूमिकेवर गंभीर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करते. या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने राजकीय भूमिका न घेता केवळ संवैधानिक चौकटीत राहून कार्य करणे का आवश्यक आहे.लोकशाही टिकवायची असेल, तर निवडणुका केवळ वेळेवर नव्हे तर विश्वासार्हही झाल्या पाहिजेत. हा विश्वास निर्माण करण्याचे आणि टिकवण्याचे कार्य भारतीय निवडणूक आयोगाचे आहे. संविधानाने दिलेल्या स्वायत्ततेचा अर्थ राजकीय सत्तेपासून अंतर राखणे हाच असतो. परंतु जेव्हा निवडणूक आयोगाचे निर्णय राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी येतात, तेव्हा आयोगाची संवैधानिक तटस्थता प्रश्नांकित होऊ लागते. अशा वेळी 'निवडणूक आयोग राजकीय आहे की संवैधानिक?' हा प्रश्न केवळ कायदेशीर न राहता लोकशाहीच्या भवितव्याशी जोडला जातो.

***Plagiarism Check Report:***

Date of Report: March 01, 2026

Similarity Index: 4%

Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Kurkute, H. (2026). निवडणूक आयोगाचे राजकीयकरण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 862–866.

निवडणूक प्रक्रियेतील गैरसमज आचारसंहिता फक्त विरोधकांवर लागू होते का? मतदार याद्यांतील अनियमितता एकाच व्यक्तीची नावे अनेक ठिकाणी असणे मृत / स्थलांतरित मतदारांची नावे राहणे काही मतदारांची नावे अचानक वगळली जाणे यामुळे “खोटे मतदार” किंवा “मतदार दडपशाही”चे आरोप होतात. निवडणूक आयोगाची स्वायत्तता Election Commission of India ही घटनात्मक संस्था असली तरी सत्ताधाऱ्यांवर कठोर कारवाई न होणे, निर्णयांत विलंब यामुळे तिच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होतात. सत्तेचा व पैशाचा गैरवापर सरकारी यंत्रणा, निधी, जाहिरातींचा निवडणुकीत वापर निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन यामुळे स्पर्धेतील समता (level playing field) बिघडते. मीडिया व माहितीचा प्रभाव, पक्षपाती वृत्तांकन सोशल मीडियावरील अफवा, फेक न्यूज यामुळे मतदारांच्या मतनिर्मितीवर परिणाम होतो. मतदार यादी तयार करणे, निवडणुकांचे वेळापत्रक ठरवणे, आचारसंहितेची अंमलबजावणी, मतमोजणी प्रक्रिया आणि तक्रारींचे निवारण या सर्व बाबींमध्ये आयोगाची कार्यक्षमता आणि तटस्थता कसोटीला लागलेली आहे. या प्रत्येक मुद्द्यावर आयोगावर आरोप होत आहेत. प्रस्तुत लेखात निवडणूक आयोगाच्या राजकीयकरणावर विवेचन करण्यात येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे**

- निवडणूक आयोगाच्या निर्णय प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेपाचे स्वरूप व परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके**

- निवडणूक आयोगाचे वाढते राजकीयकरण त्याच्या संवैधानिक स्वायत्ततेला कमकुवत करते.
- निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत शंका निर्माण झाल्यास लोकशाही व्यवस्थेवरील जनविश्वास कमी होतो.

**न्यायालयाकडून निवडणूक आयोगाच्या अधिकारांचा सन्मान**

मागील दशकात न्यायालयाने अनेकदा आयोगाच्या निर्णयस्वातंत्र्याचा सन्मान केला आहे, जिथे अधिक सतर्कतेची आवश्यकता होती. Hans Raj Jain v. ECI (2020) प्रकरणात EVM व VVPAT मधील तफावती असलेला मुद्दा न्यायालयाने आयोगाकडेच विचारासाठी सोपवला परंतू त्यामध्ये कोणतेही सार्वजनिक लेखापरीक्षण झालेले दिसत नाही. तसेच कागदी मतपत्रिकांसाठी केलेल्या Nyaya Bhoomi v. ECI-2018 आणि C.R. Jaya Sukin v. ECI 2021–22 याचिका सखोल चर्चेशिवाय फेटाळण्यात आल्या. N. Chandrababu Naidu v. Union of India-2019 मध्ये प्रशासकीय व्यवहार्यता या कारणावर प्रत्येक विधानसभा विभागात फक्त पाच VVPAT पडताळणीला परवानगी देण्यात आली जी एकूण EVM मशीनच्या २% पेक्षाही कमी होती. त्यामुळे न्यायालयाने आता निवडणूकीच्या संदर्भात सजग आणि जागृत होण्याची गरज आहे. काही निर्णय स्वतःहून देण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच निवडणूक आयोग आणि शासन यांच्यातील घटनात्मक सत्ता संतुलन टिकेल आणि निवडणूक आयोगावरील राजकीय प्रभाव काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

**सत्तेतील लोकांवर कार्यवाही नाही**

महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यातील निवडणूकवाद २०२६ च्या सुरुवातीला मुंबई महानगरपालिका (BMC) निवडणुकीच्या नामांकन प्रक्रियेदरम्यान समोर आला. हरिभाऊ राठोड यांचा आरोप आहे की, ३० डिसेंबर २०२५ रोजी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राहुल नार्वेकर निवडणूक कार्यालयात स्वतः उपस्थित होते. तिथे त्यांनी राठोड यांच्याशी हुज्जत घातली आणि त्यांची पोलीस सुरक्षा काढून घेण्याची तसेच 'बांबू' दाखवण्याची धमकी दिली. या घटनेचा एक कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मुंबई महापालिका आयुक्तांकडून या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागवला आहे.संबंधित निवडणूक कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्यात आल्याचा दावाही विरोधी पक्षांनी केला.शिवसेनेचे कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांनी हिंगोलीत मतदान करत असताना गोपनीयतेचा भंग केला. त्यांनी मतदान केंद्रामध्ये मोबाईल नेत घोषणाबाजी केल्याचा व्हिडिओ समोर आला. तसेच त्यांनी मतदान कक्षात जाऊन महिलेला मतदान चिन्ह सांगितले, त्याचबरोबर घोषणा दिल्या आणि निवडणूक गोपनीयतेचा भंग केला. अशा घटना संदर्भात कडक कायदेशीर कार्यवाहीची गरज आहे.

**महानगरपालिकांच्या निवडणुकीत बिनविरोध निवडी**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत प्रत्यक्ष मतदानापूर्वीच एक ऐतिहासिक आणि वादग्रस्त चित्र समोर आले आहे. राज्याच्या विविध महापालिकांमध्ये ६९ ते ७० उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, यामध्ये सत्ताधारी महायुतीने एकतर्फी वर्चस्व गाजवले आहे. पक्षनिहाय आकडेवारीनुसार, भारतीय जनता पक्षाने (भाजप) सर्वाधिक ४४ जागांवर विजय मिळवला आहे. त्याखालोखाल शिवसेनेने (एकनाथ शिंदे गट) २२ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) २ जागा जिंकल्या आहेत. मालेगावमध्ये इस्लामिक पार्टीचा १ आणि एका ठिकाणी अपक्ष उमेदवाराची बिनविरोध निवड झाली आहे. प्रामुख्याने कल्याण-डोंबिवली (२१ जागा), जळगाव (१२ जागा) आणि पिंपरी-चिंचवड (५ जागा) या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडी झाल्या आहेत. मात्र, इतक्या मोठ्या संख्येने झालेल्या बिनविरोध निवडींमुळे राजकीय वातावरण तापले आहे. विरोधी पक्षांनी (महाविकास आघाडी) आरोप केला आहे की, सत्ताधाऱ्यांनी पोलीस आणि सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून विरोधी उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी धमकावले किंवा त्यांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव बाद ठरवले.विशेषतः मुंबईतील कुलाबा भागात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या नातेवाईकांच्या निवडीवरून गंभीर आरोप झाले आहेत.या सर्व तक्रारींची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने या ७० जागांच्या निवडीची राज्यव्यापी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, पण चौकशा वस्तुनिष्ठ होत नाहीत आणि त्या सत्ताधाऱ्यांना पूरक असतात.

**निवडणूक आयोगाच्या कामकाजात पारदर्शकतेचा अभाव**

बिहारमधील SIR प्रक्रियेद्वारे सुमारे ६५ लाख मतदारांची नावे काढून टाकणे.एकाच व्यक्तीच्या अनेक नोंदी, वेगवेगळ्या राज्यांमध्ये समान EPIC क्रमांक, असामान्यपणे मोठ्या मतदारसमूहाशी जोडलेले पत्ते, तसेच एका मतदाराकडून अनेक मते

टाकल्याचे बूथ नोंदी. निवडणूक आयोगाने आतापर्यंत हे आरोप फेटाळले असून प्रतिज्ञापत्रांची मागणी केली आहे आणि वेळेत हरकती नोंदविल्या नाहीत, असा दोष राजकीय पक्षांवर ढकलला आहे. स्वयंघोषणांवर आधारित मतदार नोंदणी, शोध न करता येणाऱ्या प्रतिमारूप PDF मतदारयादी ज्यामुळे स्वतंत्र लेखापरीक्षण अशक्य होत आणि शिथिल पडताळणी प्रक्रिया ही या समस्यांची ठळक उदाहरणे आहेत. याशिवाय, निवडणूक खर्चावरील अपुरी देखरेख, अपूर्ण VVPAT पडताळणी, EVM सुरक्षेचे सखोल लेखापरीक्षण न करणे, बूथवरील CCTV फुटेज जतन करण्यास अनिच्छा, आणि अंतिम मतदान आकडे जाहीर करण्यात होणारा विलंब या सर्व व्यापक आडचणी निवडणूक आयोगाच्या कामकाजात दिसतात.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते कि, निवडणूक आयोगाची संवैधानिक स्वायत्तता प्रत्यक्षात धोक्यात येत असल्याची जाणीव अधिक ठळकपणे समोर येते आहे.

खालील उपायाचा अवलंब केल्यास निवडणूक आयोगाची संवैधानिक स्वायत्तता टिकून राहण्यास मदत होईल.

- आयोगाचे स्वतंत्र प्रशासन व थेट आर्थिक तरतूद करणे, जेणेकरून सरकारवरील अवलंबित्व कमी होईल.
- निवडणूक वेळापत्रक, आचारसंहिता व मतदार याद्यांबाबतचे निर्णय लेखी कारणांसह सार्वजनिक करणे.
- आयुक्तांना ठराविक कार्यकाळ व पदावरून काढण्यासाठी कठोर, संसदीय प्रक्रिया ठेवणे.
- मुख्य निवडणूक आयुक्त व आयुक्तांची नियुक्ती पंतप्रधान, विरोधी पक्षनेते व सरन्यायाधीश यांच्या समितीद्वारे करणे.
- सत्ताधारी व विरोधी पक्षांवर कोणताही दुजाभाव न ठेवता कडक व समसमान कारवाई करणे.

**संदर्भ**


1. State Election Commission, Maharashtra. (2026). Municipal corporation elections 2026: Notifications, schedules and results. Mumbai, India: Government of Maharashtra.
2. Election Commission of India. (2025). Electoral reforms and local body elections in India. New Delhi, India: Election Commission of India.
3. Joshi, A. (2024). Local self-government and urban democracy in India. Pune, India: Vidya Prakashan.
4. देशपांडे, जी. (2026, January 16). महानगरपालिका निवडणूक २०२६ : शहरी राजकारणाची नवी दिशा. लोकसत्ता. मुंबई, भारत.
5. कुलकर्णी, एस. (2026, January 18). महापालिका निवडणुकांत पक्षीय समीकरणे आणि मतदारांचा कल. सकाळ. पुणे, भारत.
6. पाटील, ए. (2026, January 20). महानगरपालिका निवडणूक निकाल आणि लोकशाही प्रक्रिया. लोकमत. नागपूर, भारत.

7. Maharashtra Times. (2026, January 15). राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान. महाराष्ट्र टाइम्स. मुंबई, भारत.
8. The Hindu. (2026, January 17). Municipal elections and the challenge of urban governance. Chennai, India.
9. Indian Express. (2026, January 19). Urban local body elections and democratic accountability. New Delhi, India.
10. Bhat, M. (2021). Independence and accountability of the Election Commission of India. Asian Journal of Comparative Law, 16(2), 315–337.
11. Sridharan, E., & Vaishnav, M. (Eds.). (2019). Rethinking public institutions in India. New Delhi, India: Oxford University Press.
12. Quraishi, S. Y. (2025, November 7). The role of the Election Commission as a guardian of democracy [Annual lecture]. DAKSH India.